(SJIF) Impact Factor-7.675

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2020

SPECIAL ISSUE-CCXXV (225)

## Domestic Violence: Impact on Indian Society




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr Nitin A. Mathankar
Principal
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

Guest Editor:
Prof. Deoman Umbarkar
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

| | | |
|---|---|---|
| 108 | विशिष्ट खेळातील सामान्य हिंसा डॉ. उदय दा. मेंडुलकर | 464 |
| 109 | स्त्रि श्रमिकांचे शोषण : कार्ल मार्कसचा दृष्टिकोण प्रा. वनिता चोरे | 469 |
| 110 | भारतीय समाज व स्त्रीमुक्ती शैलेश देविदास जनबंधु | 474 |
| 111 | स्त्री सक्षमीकरण व संरक्षण प्रा. रमेश सुखदेवराव आगलावे | 477 |
| 112 | घरगुती हिंसा – कारणे, परिणाम व उपाययोजनाएक समाजशास्त्रीय अध्ययन प्रा. संदीप रायबोले | 481 |
| 113 | ''कौटुंबिक हिंसेवर संगीत एक उपाय'' प्रा. अशोक एस. जाधव | 486 |
| 114 | अहिंसात्मक श्रमसंस्कृती प्रा.रविंद्र वा. शेंडे | 489 |
| 115 | पुरुषी मानसिकता आणि कौटुंबिक हिंसाचार विठ्ठल सदाशिव चौधरी | 493 |
| 116 | पुरुषप्रधान व्यवस्था आणि घरगुती हिंसाचार डॉ. पार्वती विनायक माने | 497 |
| 117 | कौटुंबिक हिंसाचार समाज आणि कायदा प्रा. राजू बुरीले | 500 |
| 118 | कौटुंबिक हिंसाचार व स्त्रियांचे मानवी अधिकार सहा. प्रा. राहुल ज. जोधळे | 506 |
| 119 | कौटुंबिक हिंसाचाराबद्दल सरकारची धोरणे सहा. प्रा. राहुल आर. लव्हाळे | 510 |
| 120 | महिलांच्या संदर्भात मानवी अधिकार आणि हिंसाचार प्रा. सतोष मारोतराव रामटेके | 514 |
| 121 | कौटुंबिक हिंसाचार कारणे व उपाय डॉ. उल्हास रामजी राठोड | 518 |
| 122 | स्त्री आणि कौटुंबिक हिसाचार सहा.प्रा.संदीप एस.उप्पोड | 521 |
| 123 | भारतीय महिलांची कृषी क्षेत्रातील भूमिका व समस्या प्रा.डॉ. किशोर मो. दुर्गे | 524 |
| 124 | भारत में महिला और घरेलू हिंसा कानून प्रा. अनिलकुमार हनुमानदास गुप्ता | 526 |
| 125 | भारतीय समाजातील कौटुंबिक अत्याचार प्रा. डॉ. ज्ञानेश्वर टी. शेन्डे | 530 |
| 126 | 'महिलांवरील अत्याचार व आद्य भारतीय समाजसुधारक' प्रा. डॉ. मोतीराज रामदास चव्हाण | 538 |
| 127 | घरगुती हिंसाचार : कारणे व उपाययोजना डॉ. नलीनी आय. बोरकर | 542 |
| 128 | कौटुंबिक हिंसाचार: भारतातील सद्यस्थिती डॉ. राहुल भगत | 548 |
| 129 | वर्तमान संस्कृती आणि कौटूंबिक हिंसाचार डॉ. रमेश एम. घोनमोडे | 555 |
| 130 | महिला सशक्तीकरण डॉ. स्मिता दि. जोशी | 560 |

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

154

# अहिंसात्मक श्रमसंस्कृती

प्रा.रविंद्र या. शेंडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख लोकमान्य महाविद्यालय, वरोरा

भारतीय वस्तू विदेशात प्रसिध्द होत्या असा इतिहास सापडतो. त्यावरून लक्षात येते की, पूर्ण रोजगार उपलब्ध होता, कौशयल्याचे कौतूकसुध्दा होत होते. कामगार शोषणाचा अभाव होता. ''से चा बाजार नियम पूर्ण रोजगाराला पाठींबा देत होता. ''पुरवठा स्वत:ची मागणी स्वत: निर्माण करतो'' हे से चे समिकरण १९२९ पर्यंत प्रत्येक देशात पहायला मिळत होते. प्रत्येक देशात पूर्ण रोजगाराबाबत चांगले वातावरण असतांना ''बदलत्या श्रससंस्कृतीमुळे'' पूर्ण रोजगाराला धक्का आणि अपूर्ण रोजगार तयार झाला आहेव आज अपूर्ण रोजगार दूर करण्यासाठी अहिंसात्मक श्रमसंस्कृतीकडे दुर्लक्ष करून इतर उपाय वापरले जात असल्यामुळे असलेल्या बेकारीत घट होण्याऐवजी ती वाढत आहे. यासाठी मागच्या काळात व आजही ज्या—ज्या क्षेत्रात अधिक लोकांना सामावून घेण्याची शक्ती आहे व पर्यावरणात भर पडेल अशा क्षेत्राकडे प्रथमत: लक्ष देणे आवश्यक आहे. आज औद्योगिक क्रांती ४.० सूरू आहे त्यापासून गीक अर्थव्यवस्था निर्माण न करता शाश्वत व सर्वसमावेशक अर्थव्यवस्था निर्माण करणे अपेक्षित आहे. प्रतिस्थापनेचा वापर रोजगारात सावधतेने करणे आवश्यक आहे. प्रतिस्थापनेमुळे मागचे व पूढचे दुवे मजबूत होणे आवश्यक आहे. केन्स यांनी रोजगाराचा सिध्दांत जो सांगीतला आहे तो खरोखर वापरण्यासारखा आहे. केन्सचा प्रभावी मागणीचा सिध्दांत वापरत जात असतांना पर्याप्त लोकसंख्येचा विचार एकत्र करणे गरजेचे आहे. रोजगारप्रेरित व लोकसंख्या नियंत्रीत वृध्दी या समिकरणाला महत्व भारतासारख्या देशात आवश्यक आहे. संभाव्य ग्राहक, संभाव्य उत्पादन, संभाव्य नफा अशा विविध घटकाकडे सरकार व उद्योजकांनी लक्ष देण्याबरोबरच रोजगारीचा प्रश्न सोडवितांना लोकसंख्येकडे लक्ष देणे आवश्यक आहे. काम कामगारांची प्रतिक्षा करेल व कामगारांची कामाची गरज पूर्ण होईल व त्यातूनच पूर्ण रोजगारीचे उदिष्टये प्रत्येक देशात पहायला मिळतील. श्रमसंस्कृतीतील बदल पूर्ण रोजगाराला पाठिंबा देणारा हवा तसेच पर्यावरणाला पाठिंबा देणारा हवा. यासाठी शोषण व २४x ७ हे सूत्र रोजगार क्षेत्रातील बदलविणे आवश्यक आहे. एकूणच सर्वांना काम व कामात आनंद अशी अहिंसात्मक श्रमसंस्कृती रूजने अपेक्षीत आहे.

**विषयाची निवड :—**

औद्योगिक क्रांती ४.०, गीग अर्थव्यवस्था,२४x७ व शोषण अशा वातावरणात श्रमसंस्कृती पूर्ण बदलली आहे. अस्तीत्वात असलेल्या श्रमीकांना कामापासून आंनद मिळत नाही व पात्र असलेलेलीलोक बेकार आहे. अशास्थितीतसर्व श्रमिकांना आनंद देणारे रोजगार क्षेत्र हवे आहे. यासाठी सर्वांचा प्रयत्न अहिंसात्मक श्रमसंस्कृतीची अपेक्षा करणे साहजिकच आहे. अहिंसात्मक श्रमसंस्कृतीनिर्माण होण्यासाठी या विषयांची निवड केली आहे. विषयाच्या विश्लेषणासाठी दुय्यम सामुग्रीचा वापर करण्यात आला आहे.

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

संशोधनाची उदिष्ट्ये :-

१) भारतीय लोकसंख्या आणि बदलती श्रमसंस्कृती यातील परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.

२) केन्सचा प्रभावी मागणीचा उपाय ग्रामीण परिसरातील छुप्या बेरोजगारीबावत वापरता येते काय? याचा अभ्यास करणे.

३) जगातील सर्व देशांनी एकत्र येऊन आवश्यक अहिंसात्मक श्रमसंस्कृतीला चालणा देणे आवश्यक आहे. याचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीते :-

१) सामान्य जनतेसाठी रोजगार हा उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे.

विषयाचे विश्लेषण

अ) भारतीय लोकसंख्या, बदलती श्रमसंस्कृती आणि अपूर्ण रोजगार

भारतीय लोकसंख्या आणि भारतातील रोजगारीचा प्रश्न यांचा जवळचा संबंध आहे. देशातील अपूर्ण रोजगार दूर करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनेमध्ये ''पर्याप्त लोकसंख्या'' नियंत्रणाकडे बरेच दुर्लक्ष केले आहे. अधिक लोकसंख्या, मोठी बाजारपेठ, मोठा ग्राहकवर्ग या सर्व गोष्टी जमेच्या असल्या तरी दीर्घकाळासाठी यात संतुलन टिकविणे बाजारपेठेला सुध्दा शक्य होत नाही. बाजारपेठेला असा बॅलेन्स सांभाळता न आल्यास पूढे ती समस्या समस्या बनते व उपाययोजना बाजारातून न सूचता मुळ कारणांचा शोध घ्यावा लागतो. भारतातील बेकारीबाबत आपल्या लोकसंख्येच्या आकाराकडे बघणे आवश्यक आहे.

बदल हा नैसर्गिक गुण प्रत्येक घटकामधील असला तरी श्रमसंस्कृतीतील बदल पूर्ण रोजगाराला प्रेरीत करणारा असावा. श्रमसंस्कृतीतील बदल पूर्ण रोजगाराला प्रेरीत करू शकते. परंतू त्यासाठी देशांची लोकसंख्या ही पर्याप्त असणे आवश्यक आहे.पर्याप्त लोकसंख्या शक्य तितक्या लवकर जणगणनेत अस्तित्वात आल्यास पूर्ण रोजगारीची पातळी कठीण असली तरी शक्य आहे. पूर्ण रोजगारासाठी मुळ श्रमसंस्कृती व बदलती श्रमसंस्कृती यात ताळमेळ असणे आवश्यक आहे.

२) केन्सचा प्रभावी मागणीचा उपाय :-

''से'' चा बाजाराचा नियमखोटा ठरल्यानंतर केन्स यांनी जागतिक महामंदीनंतर जे रोजगारीबाबत विवेचन सांगीतले आहे. त्यात कायम दुर्लक्ष होत असल्यामुळे पूर्ण रोजगार अजूनही कोणत्याही देशात अस्तित्वात आलेला नाही. हे सत्य आहे.

केन्स यांनी प्रभावी मागणीत व गुणक प्रक्रियेत सांगीतलेली गृहिते भारतातील ग्रामीण परिक्षेत्रात म्हणजेच शेती क्षेत्रात तंतोतंत आज पहायला मिळत आहे. ती गृहीते व भारतातील वास्तविकता पुढीलप्रमाणे

१) अतिरिक्त उत्पादनक्षमता— आज शेतीत, ग्रामीण भागात व प्रत्येक क्षेत्रात शिल्लक आहे.

२) अनैच्छीक बेकारी — भारतामध्येछुपी बेरोजगारी प्रचंड आहे.

३) भांडवल गतिशिलता —आज भांडवल बॅकामार्फत पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होत जात आहे.

४) औद्योगिक अर्थव्यवस्था—आज शेतीत व्यावसायीक दृष्टिकोन रूजत जात आहे.

ही सर्व गृहीतके ग्रामीण भागात पहायला मिळत असल्यामुळे केन्सच्या प्रभावी मागणीचा उपाय ग्रामीण परिसरात वापरणे योग्य आहे. यामुळे सार्थक उपभोग प्रवृत्तीत वाढ होऊन म्हणजे प्रभावी मागणीत वाढ होऊन रोजगाराच्या क्षेत्रात प्रचंड बदल निर्माण होईल व होणारा बदल पर्यावरणस्नेही असल्यामुळे तो प्रत्येकाला रूजणारा आहे.

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

३) अहिंसात्मक श्रमसंस्कृतीला बाजारपेठेचा व सर्व देशांचा पाठिंबा

जगाच्या पाठीवर जेवढे देश आहे. त्या प्रत्येक देशांनी सर्वांना रूचेल अशा तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. यासाठी सर्व राष्ट्र प्रमुखांनी एकत्र येऊन त्याचा निर्णय तात्काळ घेणे आवश्यक आहे. सद्यापिढीतील लोकांना नवीन तंत्रज्ञानाचा फायदा होत असला तरी नवीन पिढीचे आरोग्य बिघडत आहे. याचा विचार करून श्रमसंस्कृतीत बदल आवश्यक आहे.

माझ्या स्वप्नाचे जग श्रमसंस्कृतीला प्रतिष्ठा देणारं असणार, पर्याप्त लोकसंख्येला प्रेरित करणारे असणार, पर्यावरणास्नेही वातावरण, प्रत्येकाच्या हातात साधनधन व त्याचा काटकसरीने वापर, बाजारपेठेची ताकद मोठी असली तरी प्रभावी मागणीला प्रोत्साहन, तसेचअंध, अपंग, कुशल, अकुशल अशा सर्वांना सर्व क्षेत्रात कामाची संधी व उत्पन्न वितरणावर प्रत्येक वेळी प्रत्येकांचे लक्ष अशी नवीन श्रमसंस्कृती प्रत्येक देशत रूजने अपेक्षीत आहे. सद्यास्थितीत चौथी औद्योगीक क्रांती सूरू असली तरी येणारी पाचवी औद्योगिक क्रांती मुळ श्रमसंस्कृती व सद्यास्थितीतील श्रमसंस्कृती यात समन्वय निर्माण करणारी अपेक्षीत आहे. कंटाळवाण्या श्रमसंस्कृतीला आपण सर्वजनांणी विरोध करणे अपेक्षित आहे. त्याजागी आनंद देणाऱ्या श्रमसंस्कृतीचा वापर उत्तोरोत्तर आवश्यक आहे. प्रत्येक देशामध्ये एकमेकांचा चांगला वाग्गहक्क मिळाल्यास जागतिक पूर्ण रोजगार पातळी, जागतिक प्रभावी मागणीच्या साहाय्याने सोडविणे शक्य आहे. आज जगाच्या पाठीवर एका देशाकडे मोठ्या प्रमाणात बेरोजगारी आहे. तर दुसऱ्या देशाकडे अतिरीक्त भांडवल आहे. तर तिसऱ्या देशाकडे व्यावसायिक दृष्टिकोणाच्या बऱ्हाच युक्त्या आहे आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे अतिरिक्त क्षमता सर्वांकडे शिल्लक असलेली दिसते. अशा सर्वांचा मेळ चांगल्या श्रमाच्या तंत्राने घडवून आणल्यास जागतिकरणात पूर्ण रोजगारीची पातळी जागतिक प्रभावी मागणीने सोडविता येणारी आहे. आंतरराष्ट्रीय संस्थांची स्थापणा सुध्दा अशाच उद्देशाने झालेली आहे आपत्तीत एकमेकांना मदत करायची आहे. परंतु अशा सामान्य स्थितीतही आपणा सर्व देशांना एकमेकांना मदत करावयाची आहे. हे अंतिम सत्य आहे.

४) स्वायत्त व प्रेरित गुंतवणूकीची मैत्री आणि रोजगार

सरकारमार्फत जी गुंतवणूक करण्यात येते त्या गुंतवणूकीला स्वाय्यत्त गुंतवणूक असे म्हणतात. स्वाय्यत्त गुंतवणूकीवर व्याजदर, नफा, किंमतपातळी अशा घटकांचा परिणाम होत नसल्यामुळे ही गुंतवणूक स्वतंत्र गुंतवणूक असते. सरकारमार्फत ही गुंतवणूक प्रत्येक वेळी होणे गरजेचे आहे.

प्रेरित गुंतवणूकही खाजगीकरणाशी संबंधीत आहे. प्रेरीत गुंतवणूकीवर सर्व घटकांचा परिणाम होत असल्यामुळे प्रेरित गुंतवणूक ही स्वाय्यत्त गुंतवणूकीसारखी महत्वाची आहे. देशाच्या व जागतिक अर्थव्यवस्थेच्या संतुलित विकासासाठी प्रेरित व स्वाय्यत्त गुंतवणूकीत संतुलन अपेक्षित आहे. प्रेरित व स्वाय्यत्त गुंतवणूकीत समानता असणे आवश्यक आहे. प्रेरित गुंतवणूक कमी व स्वाय्यत्त गुंतवणूक अधिक किंवा स्वाय्यत्त गुंतवणूक कमी व प्रेरित गुंतवणूक अधिक विकासासाठी योग्य नाही. दोन्ही गुंतवणूकीसारख्या महत्वाच्या आहे. दोन्ही गुंतवणूकीमार्फत सर्वनाश शून्य व सर्वोदय अधिका अधिक वाढल्यास, प्रत्येक घटकामध्ये गतिशिलता येऊन अनुकूलतेने अंतिम स्त्रोत खुले होईल व त्यातूनच राष्ट्राची व जगाची अंतिम क्षमता पूर्ण वापरात येईल.

समारोप

दुर्बल व निसर्ग यांचे शोषण न करता रोजगार संधी प्रत्येक देशातील वाढणे आवश्यक आहे. अहिंसात्मक व प्रशासन अर्थशास्त्राचा आधार, आंतरराष्ट्रीय संघटनावर दडपणाचा अभावतसेच बदलत्या श्रमसंस्कृतीत श्रमप्रतिष्ठा भांडवल प्रतिष्ठेपेक्षा अधिक महत्वपूर्ण असणे आवश्यक आहे. उत्तेजनात्मक नियोजनबदलत्या श्रमसंस्कृतीत वापरणे गरजेचे आहे. पुरोगामी

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN :
2278-9308
March
2020

अनुदानाचीही प्रक्रिया ही सुध्दा अधिक क्रियाशील असणे यात आवश्यक आहे, एकाधिकारयुक्त बाजारपेठेतील प्रत्येक वैशीष्टे व प्रसंगी किंमतभेदही वापरणे आवश्यक आहे. वयाच्या १८ व्या वर्षापर्यंत तसेच वयाच्या ६० वर्षानंतर सर्व खर्च शासनाने उचलल्यास देशाची कार्यक्षमता, बचत क्षमता व गुंतवणूक क्षमता वाढून उत्पादनाचा भाग मोठा होईल. बदलत्या श्रमसंस्कृतित उत्पादन घटकांच्या योग्य मोबदल्याचाही विचार करणे आवश्यक आहे. एकूणच सर्वांना काम व कामात आनद अशी शाश्वत व सर्वसमावेशक विकासाला अहिंसात्मक श्रमसंस्कृती आवश्यक आहे.

संदर्भ ग्रंथसूची

१) डॉ. विनायक देशपांडे, भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण व विकास), हिमालया पब्लिशींग, नागपूर.

२) अर्थब्रम्ह, लोकसत्ता २०१७ – १८

३) अर्थसंवाद खंड ३८, ३९